POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३ ● मुंबई, बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ठाण्यातील अनधिकृत बांधकामांचा दंड माफ, शिंदेच्या नगरविकास विभागाचा निर्णय





**■ठाणे । प्रतिनिधी,**

महापालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले असताना एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याने एक मोठा निर्णय घेतला आहे. ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामाचा दंड माफ करण्याचा निर्णय नगरविकास खात्याने घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील अवैध बांधकामावर करण्यात येणारा दंड हा साधारणतः 2009 पासून थकीत होता. सरकारच्या या निर्णयामुळे राज्य सरकारचे शेकडो कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. महापालिका निवडणुकांच्या तोंडावर राज्य सरकारने अनधिकृत बांधकामाला संरक्षण दिल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामाचा महापालिकेकडून आकारण्यात येणारा दंड माफ करून राजकीय फायदा घेतला आहे. पण यामुळे सरकारी तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार असल्याचा आरोप विरोधक करू लागले आहेत. महापालिकेच्या महसुलावर परिणाम अवैध बांधकामांवर आकारण्यात येणारा हा दंड 2009 पासून थकित होता.

या शिवाय आकारल्या जाणाऱ्या दंडाचे प्रमाण हे मूळ करापेक्षा जास्त होते. त्यामुळे मालमत्ताधारकांकडून दंड भरला जात नव्हता. त्याचा परिणाम ठाणे महापालिकेला कर रूपाने मिळणाऱ्या महसुलावर झाला होता. दंड माफीसाठी अटी आणि शर्ती लागू शासनाच्या या नव्या निर्णयामुळे ठाणे महापालिका क्षेत्रात आकारण्यात येणारा 31 मार्च 2025 पर्यंतचा थकीत दंड माफ होणार आहे. मात्र, त्यासाठी सरकारने अटी आणि शर्ती घालून दिल्या आहेत. बेकायदा बांधकाम असलेल्या मालमत्ताधारकांनी मूळ कराची भरणा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच थकीत दंड माफ होईल. अवैध बांधकामावरील दंड माफ झाला म्हणजे सदरचे बांधकाम नियमित झाले असे समजण्यात येणार नाही. दंड माफ केला म्हणून त्यापोटी संबंधित महापालिकेस राज्य सरकारकडून कोणतेही अर्थसहाय्य अथवा नुकसान भरपाईची मागणी करता येणार नाही, असे शासन निर्णयात म्हटले आहे. महापालिका निवडणुका लवकरच उच्च न्यायालयाच्या निदेर्शानंतर राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यापर्यंत नवीन वॉर्ड रचना केली जाणार असून महापालिकेच्या निवडणुका या डिसेंबरच्या दरम्यान होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसल्याचं दिसून येतंय. ठाणे हा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो.

त्यामुळेच या शहरातील अवैध बांधकामाच्या दंडाची माफी करून त्याचा राजकीय फायदा उचलला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

## लोकसभेला नव्हती, पण विधानसभेला नावं होती, साताऱ्यात बोगस मतदार नोंदीचा पंचनामा, तहसील कार्यालयाचा खुलासा



**■कराड । प्रतिनिधी,**

काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतांची चोरी कशी झाली, याबद्दल निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहे. राहुल गांधींच्या आरोपानंतर निवडणूक आयोगाने कोणतीही प्रतिक्रिया दिली. सोमवारी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयाबाहेर जोरदार निदर्शनं केली. दरम्यान, काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मतदारसंघात लोकसभेला जी नावं मतदार यादीत नव्हती. मात्र विधानसभेला नावं असल्याची माहिती आता समोर आली आहे. काँग्रेस नेते खासदार राहूल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा देशभर उचलला असताना आता साताऱ्यातील कराड दक्षिण मतदार संघातील कापील गोळेश्वर गावात 2024 विधानसभा निवडणुकीत बोगस मतदार नोंद झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत तहसील कार्यालयकडून पंचनामा करण्यात आला असून सदरची नावे 2024 लोकसभा निवडणूक यादीत समाविष्ट नव्हती, मात्र 2024 विधानसभा निवडणुक यादीत समाविष्ट आहेत. परंतु. ती नावे कशी समाविष्ट झाली यांचा कोणताही पुरावा नसल्याने कमी करावे, असे पंचनाम्यात तहसील कार्यालय कराड यांनी म्हटलं आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मतदार नोंदणीत गोलमाल झाल्याचे आरोप सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार यांनी केला आहे. कराड दक्षिण मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झाला होता. तर भाजपचे डॉ. अतुल भोसले यांचा विजय झाला. काँग्रेसकडून कराड दक्षिण मतदारसंघात वारंवार बाहेरील मतदार वाढवल्याचा आरोप केला जात आहे. आता तहसील कार्यालयाच्या पंचनाम्यावर पृथ्वीराज चव्हाण आणि आमदार अतुल भोसले काय भूमिका घेणार हे पाहावे लागणार आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये शिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी

**■भाईदर। प्रतिनिधी,**

मिरा- भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात गेल्या ८ महिन्यांपासून शिक्षणाधिर्कायांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे मिरा- भाईंदर महापालिका शिक्षण विभागामध्ये शिक्षणाधिर्कायांची नियुक्ती करण्याची मागणी माजी नगरसेवक अजित पाटील यांनी केली आहे. मिरा- भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेमध्ये शहरांत खासगी, अनुदानित, इंग्रजी, मराठी, गुजराती, हिंदी माध्यमांच्या शाळांची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर आहे. मिरा- भाईंदर महापालिकेच्या शहरात विविध भागात ३६ शाळा आहेत. शहरामध्ये असलेल्या शाळा, कॉलेजची संख्या विचारांत घेता शाळा कॉलेजच्या समस्या अडीअडचणी सोडविणे, शाळांवर नियंत्रण, देखरेख करण्यासाठी असलेल्या शिक्षणाधिकारी यांची जागा रिक्त आहे. महापालिकेमध्ये शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या शिक्षणाधिर्कायांची अन्य ठिकाणी बदली झाली आहे. गेल्या ८ महिन्यांपासून महापालिकेमध्ये शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे. शासकीय शिक्षणाधिकारी शिक्षण विभागामध्ये कार्यरत नसल्याने शहरातील विविध शाळा व्यवस्थापनास, शाळेतील मुख्याध्यापकांना अनेक अडी अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. शासनाकडून प्रतिनियुक्तीवर येर्णाया शिक्षणाधिर्कायांचा कार्यभार महापालिकेचे अधिकारी सांभाळत आहेत. शासनाच्या शिक्षणाधिर्कायांना शैक्षणिक, शाळाविषयक कायदे नियम, शासनाचे विविध प्रकारच्या आदेश, परिपत्रकाचे सखोल ज्ञान असते. त्यामुळे शहरातील सर्व शाळांवर परिणामकारक नियंत्रण देखरेख ठेवू शकतात. तसेच शासनाच्या धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी करणेस सक्षम असतात. मिरा- भाईंदर शहरात असलेल्या विविध माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांची संख्या जवळपास साडे तीनशे आहे. त्यामुळे महापालिकेच्या शिक्षण विभागामधील रिक्त असलेल्या शिक्षणाधिकारी या पदी शासनाने तातडीने नियुक्ती करण्याची मागणी माजी नगरसेवक अजित पाटील यांनी शालेय शिक्षण विभाग राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे केली आहे.

## 'आज रतन टाटा असते तर...', एअर इंडिया अपघात पीडितांच्या वकिलांचे मोठे विधान; भरपाईच्या दिरंगाईवर टीका



**■मुंबई । प्रतिनिधी,**

जून 2025 मध्ये अहमदाबाद येथे एअर इंडियाचे विमान कोसळून मोठी दुर्घटना झाली होती. या अपघातात 250 पेक्षा अधिक जणांना प्राण गमवावे लागले होते. या अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना भरपाई देण्याची घोषणा एअर इंडियाने केली होती. मात्र, अद्याप काही जणांना भरपाई मिळाली नसल्याचे समोर आले आहे. या भीषण अपघातातील 65 हून अधिक कुटुंबांचे प्रतिनिधित्व करणारे प्रमुख वकील माईक अँड्र्यूज यांनी पीडितांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यास होत असलेल्या दिरंगाईवर टीका केली आहे. जर टाटा समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा हयात असते, तर अशी अडथळ्यांची प्रक्रिया अस्तित्वात नसती, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. अँड्र्यूज म्हणाले की, रतन टाटांचा नम्र स्वभाव आणि कर्मचाऱ्यांची काळजी घेण्याचा वारसा यामुळे मृतांच्या कुटुंबांना अशा प्रक्रियात्मक अडथळ्यांना सामोरे जावे लागले नसते. ते म्हणाले, अमेरिकेतही आम्हाला रतन टाटा कोण होते, हे माहीत आहे. त्यांचे कार्य आणि लोकांची काळजी घेण्याचा त्यांचा स्वभाव आम्हाला माहीत आहे. आम्हाला विश्वास आहे की, जर ते आज येथे असते, तर पीडित कुटुंबांना भरपाईसाठी इतका विलंब झाला नसता. अँड्र्यूज म्हणाले की, एका वृद्ध महिलेचा एकुलता एक मुलगा, जो कुटुंबाचा एकमेव आधार होता, तो अपघातात मरण पावला. ती तिच्या आरोग्याच्या खर्चासाठी मुलावर अवलंबून होती. आता तो मृत आहे. त्यांना अद्याप भरपाई मिळालेली नाही. त्यांनी आता काय करायचे? ते आता जगाच्या दयेवर आहेत. दरम्यान, एअर इंडियाने अपघातातील 229 प्रवाशांपैकी 147 जणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 25 लाख रुपयांची अंतरिम भरपाई दिली आहे.

## मुंबईतील कबुतरखान्यांवरील बंदीबाबत महत्त्वाची अपडेट; हस्तक्षेपास सुप्रीम कोर्टाचा नकार, नेमकं काय म्हटलं?

### मुंबई हायकोर्टाचे आदेश काय?

नागरिकांचे आरोग्यहित लक्षात घेऊन मुंबई परिसरातील कबुतरखाने तात्काळ बंद करण्याचे निर्देश मुंबई महापालिकेला देण्यात येतील, अशी घोषणा राज्य सरकारतर्फे ३ जुलै रोजी विधान परिषदेत करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेने बंदी लागू करून कारवाई सुरु केली. त्यानंतर ही बंदी उठवण्याची विनंती मुंबई हायकोर्टाने दोनदा फेटाळली. तसेच बंदीचा आदेश मोडून कबुतरखान्यांच्या ठिकाणांवर दाणे टाकणाऱ्यांविरोधात फौजदारी कारवाई करण्याचा आदेशही हायकोटार्ने मुंबई महापालिका व मुंबई पोलिसांना दिला. त्याप्रमाणे सध्या कारवाई सुरु आहे.



**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील कबुतरखान्यांवरील बंदीच्या प्रश्नावर हायकोटार्ने दिलेल्या अंतरिम आदेशात हस्तक्षेप करण्यास सुप्रीम कोटार्ने सोमवारी नकार दिला आहे. त्यामुळे कबुतरखान्यांवरील बंदी कायम राहिली आहे. बंदीच्या विरोधात मुंबई हायकोर्टात याचिका करणाऱ्या पल्लवी पाटील व अन्य काहींनी सुप्रीम कोर्टात अपिल केले आहे. त्याविषयी सोमवारी न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी व न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली. तेव्हा, याविषयी हायकोर्टात सुनावणी सुरू असताना आम्ही हस्तक्षेप करणे उचित होणार नाही.

अंतरिम आदेशात बदल होण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयातच अर्ज करता येऊ शकेल , असे अपिलकर्त्यांना सुचवून सुप्रीम कोटार्ने अपिल फेटाळून लावले आहे. या पार्श्वभूमीवर, मुंबई हायकोटार्चे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी व न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर या प्रश्नावर पुढची सुनावणी बुधवार, १३ ऑगस्ट रोजी होणार आहे. दुसरीकडे, बंदी कायम राहिली असल्याने बंद करण्यात आलेल्या कबुतरखान्यांच्या ठिकाणांवर आदेशाचे उल्लंघन करून कबुतरांना दाणे टाकणाऱ्या व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाईची पावले उचलणे मुंबई पोलिस व मुंबई महापालिकेने सुरू ठेवले आहे.

सुप्रीम कोर्टात अपिल कशासाठी? 'या प्रकरणात मुंबई हायकोटार्ने आमचे म्हणणे सविस्तर ऐकून न घेता अनावश्यक घाई करत अंतरिम आदेश दिले आहेत,₹ असा दावा मूळ याचिकाकर्त्या पल्लवी पाटील, सविता महाजन व अन्य काहींनी अपिलात केला आहे. त्याचबरोबर ₹मुंबईत किमान एक दशकापासून कबुतरांना दाणे टाकण्यासाठी ५१ निश्चित ठिकाणे आहेत. ती अचानक व घाईघाईत बंद करण्यासाठी कोणतेही ठोस कारण नाही. ऋग्वेद व मनुस्मृतीमध्ये शांततेचे प्रतीक म्हणून कबुतरांचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. हिंदू, जैन व इस्लाम धर्मातही कबुतरांच्या आश्रयासाठी ठिकाणे बनविण्याविषयी सांगण्यात आले आहे. मात्र, मुंबई महापालिकेने अचानक बंदी लागू केली. त्याविरोधातील आमच्या याचिकांविषयी हायकोटार्ने सविस्तर सुनावणी न घेताच कठोर अंतरिम आदेश केले. परिणामी कबुतरांचे जीव जात आहेत.

माणसांच्या आरोग्याला कबुतरांमुळे धोका निर्माण होत असल्याचे अहवाल मुंबई महापालिकेने हायकोर्टात दाखल केले. मात्र, कबुतरांची विष्ठा व पिसे यांचा मानवी आरोग्यावरील विपरित परिणामाशी थेट संबंध नाही. मुंबईत वाहने, बांधकामे, उद्योग, हॉटेले व खुल्या जागांमध्ये केला जाणारा जाळ अशा विविध कारणांमुळे वायू प्रदूषण होत आहे. त्यामुळे नागरिकांना दम्याचा त्रास होत आहे,' असा दावाही अपिलकर्त्यांनी अपिलात केला आहे.

## लोकसभेत सुधारित आयकर विधेयक सादर देशाच्या करप्रणालीत अद्ययावत, सुलभता येणार



**■नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी लोकसभेत नवीन आयकर विधेयक २०२५ ची सुधारित आवृत्ती सोमवारी सादर केली. या विधेयकात बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या बहुतेक शिफारशींचा समावेश आहे. त्यांनी आज सुधारित विधेयक सादर केले, हे विधेयक विद्यमान प्राप्तिकर कायदा १९६१ ची जागा घेणार आहे. सहा दशके जुना आयकर कायदा, १९६१ ची जागा घेणारे आयकर विधेयक १३ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आले होते. गेल्या शुक्रवारी हे विधेयक अधिकृतपणे लोकसभेतून मागे घेण्यात आले होते. वैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समितीने १३ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर केलेल्या आयकर विधेयकात अनेक बदल सुचवले होते. लोकसभेत हे विधेयक सादर झाल्यानंतर लगेचच, हे विधेयक सुधारणांसाठी निवड समितीकडे पाठवण्यात आले. ३१ सदस्यांच्या निवड समितीने प्राप्तिकर विधेयकासाठी २८५ सूचना दिल्या होत्या.

राज्यातील कोणत्या जिल्ह्यात कोण ध्वजारोहण करणार याची यादी जाहीर मुंबईः भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन समारंभ शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा ...

प्राप्तिकर विधेयक २०२५ हे भारताच्या करप्रणालीला अद्ययावत आणि सुलभ करण्यासाठी तयार केलेले आहे. जे ६० वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात असलेल्या कायद्यांची जागा घेणार आहे. त्यात सुधारित रचना, डिजिटल कर आकारणीसाठी तरतुदी, वाद निराकरण प्रणाली आणि तंत्रज्ञान आणि डेटा-चालित पद्धतींद्वारे कर संकलन वाढवण्यासाठी पुढाकार यांचा समावेश आहे

काय आहे नवीन बदल?

समितीने नवीन आयकर कायद्यात धार्मिक आणि धमार्दाय ट्रस्टना दिलेल्या अनामिक देणग्यांवर कर सूट सुरू ठेवण्यास अनुकूलता दर्शविली आहे. तसेच आयटीआर दाखल करण्याच्या अंतिम तारखेनंतरही करदात्यांना कोणताही दंडात्मक शुल्क न भरता टीडीएस परतावा मिळविण्याची परवानगी द्यावी असे सुचवले आहे.

आयकर विधेयक, २०२५ हे भारताच्या करप्रणालीला अद्ययावत आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहे. संसदीय निवड समितीच्या २८५ शिफारशींपैकी बहुतांश शिफारशींचा यात समावेश करण्यात आला आहे.आयकर (क्रमांक २) विधेयक, २०२५ लोकसभेत सादर करताना, सीतारामन यांनी सांगितले केले की या कायद्याचा उद्देश आयकर नियम सुलभ आणि अद्ययावत करणे आहे. निवड समितीच्या जवळपास सर्व शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहे.

समितीच्या प्रमुख शिफारशी

रिकाम्या मालमत्तेचा करः 'नेहमीच्या पद्धतीने' या शब्दाऐवजी रिकाम्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष भाड्याची आणि 'मान्य भाड्याची' स्पष्ट तुलना केली जाईल.

घर मालमत्तेतून वजावटः महानगरपालिका कर वजा केल्यानंतरच ३०% मानक वजावट लागू होईल, हे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, भाड्याने घेतलेल्या मालमत्तेसाठी बांधकामपूर्व व्याज वजावट वाढवण्यात आली आहे.

पगारातून वजावटः पेन्शन फंडातून पेन्शन मिळवणाऱ्या बिगर-कर्मचाऱ्यांसाठी सुधारित पेन्शन वजावटीला परवानगी मिळेल.

व्यावसायिक मालमत्ताः तात्पुरत्या वापरात नसलेल्या व्यावसायिक मालमत्तेवर 'घर मालमत्तेचे उत्पन्न' म्हणून कर आकारला जाणार नाही.

## पदासाठी स्त्री-पुरुष भेद नको; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश



**■नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

कोणत्याही पदासाठी त्या व्यक्तीची पात्रता महत्त्वाची असून त्यामध्ये स्त्री पुरुष असा भेद करता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भारतीय लष्करातील जज अॅडव्होकेट जनरल अर्थात सैनिकी कायदा सल्लागार या पदासाठी पुरुषांसाठी ६ तर महिलांसाठी ३ जागा ठेवण्याचा केंद्राचा निर्णय न्यायालयाने रद्दबादल ठरवला आहे. या पदासाठी एकत्रित गुणवत्ता यादी तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्राला दिले आहेत.

जज ॲडव्होकेट जनरल या पदासाठीच्या गुणवत्ता यादीत दोन महिला अधिकारी अनुक्रमे चौथ्या व पाचव्या आल्या होत्या. मात्र २०२३ च्या नियमानुसार ६ जागा पुरुषांना तर ३ जागा महिलांना राखीव असल्याने त्यांना हे पद मिळाले नव्हते. त्याविरोधात त्या न्यायालयात गेल्या. या खटल्याच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता व न्या. मनमोहन यांच्या पीठाने म्हटले की, सरकार अशा प्रकारे पुरुषांसाठी ६ जागा आरक्षित करु शकत नाही. या पदासाठी पुरुषाना ६ व महिलांना ३ जागा देण्याची प्रथा चालत आलेली आहे. ती निश्चित आहे असे म्हणता येणार नाही. स्त्रीपुरुष समानता व २०२३ च्या नियमानुसार केवळ योग्य व पात्र उमेदवाराला पद मिळाले पाहिजे. महिलांना जागा नाकारणे हे स्त्रीपुरुष समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन आहे. केंद्र सरकारने समानतेच्या तत्वानुसार भरती प्रक्रिया राबवावी व महिला व पुरुष उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिद्ध करावी.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## कबूतरांपेक्षा आरोग्य महत्त्वाचे

कबूतर हा धार्मिक पक्षी नाही आणि तो धार्मिक मुद्दाही होऊ शकत नाही. हा सार्वजनिक आरोग्याचा आणि पर्यावरणाचा प्रश्न आहे, आणि तो त्याच तत्त्वांनुसार हाताळला पाहिजे. आपल्या लोकशाही भारताचं राज्य सेक्युलर आहे. म्हणून जेव्हा विज्ञान की धर्म हा प्रश्न येईल तेव्हा विज्ञानाची निवड करणं हेच सार्वजनिक हिताचं ठरणार आहे. जेव्हा भावना की आरोग्य हा प्रश्न येईल, तेव्हा विज्ञानच आरोग्याचं रक्षण करेल हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. राज्य सरकारने सुद्धा भावनाताईला गप्प करून, आरोग्यदादाचं ऐकलं पाहिजे. आणि आपण म्हणजे लोकांनीही वास्तव स्वीकारायला शिकलं पाहिजे. डॉ. ऋषभ कोठारी यांनी अलीकडेच सार्वजनिक हितासाठी आणि सामाजिक सौख्यासाठी एक विनंतीवजा निवेदन केले आहे. डॉ. कोठारी म्हणतात, ह्यमी जैनधर्मीय आहे. प्राण्यांप्रती दया, करुणा आणि अहिंसेच्या तत्त्वांमध्ये माझा गाढ विश्वास आहे. कबूतरांना दाणे टाकणं ही श्रद्धेची आणि परंपरेची गोष्ट आहे, आणि माझाही भावनिक सहभाग यामध्ये आहे. पण एक डॉक्टर, पर्यावरणप्रेमी आणि जबाबदार नागरिक म्हणून मला आज काही कठोर पण आवश्यक वास्तव सांगावं लागतं आहे. कारण थोडा विचार, थोडं शास्त्र झ्र हीच खरी भक्ती असं मला वाटतं डॉ. कोठारी म्हणतात की, कबूतरांसाठी दाणे टाकणं बंद का करावं असा प्रश्न भूतदयेच्या भूमिकेतून विचारला जातो. पण हे लक्षात घ्यायला हवं, की कबूतर हा आपला स्थानिक पक्षी नाही, तो मध्यपूर्वेहून आलेला invasive species म्हणजे घुसखोरी केलेला पक्षी आहे. प्रकृतीधमार्नेच कबूतर मोठ्या प्रमाणात प्रजनन करतो. माणसांकडून भरपूर अन्न मिळालं की त्यांची संख्या अकारण भरमसाठ वाढते. त्यांची विष्ठा फुफ्फुसातील आजाराला कारणीभूत ठरते. उदाः पीजन लंग डिसीज, हायपर सेन्सिटिव्हिटी न्युमोनायटीस इत्यादी आजारांना आमंत्रण आहे. कबूतरे स्थिर नसतात. सतत उडत राहतात, जागा मिळेल तिथे ठाण मांडतात. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता होते तसंच वाहतूक अडथळे निर्माण होतात. सगळ्यात चिंतेची बाब म्हणजे कबूतरांच्या भरमसाठ संख्येमुळे आणि उपद्रवामुळे स्थानिक पक्षी, विशेषतः चिमण्या हद्दपार होत आहेत. जिथे कबूतरे आहेत तिथे चिमण्या दिसणे ही दुर्मिळ बाब बनली आहे. अन्य पक्ष्यांच्या वावरावरसुद्धा प्रतिकूल परिणाम होतो, असं आढळलं आहे. यामुळे प्राकृतिक अन्नसाखळी बिघडते, इकोसिस्टीमचा, पर्यावरणीय परिसंस्थेचा समतोल ढासळतो, आणि ही खूपच काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. कबूतरखाने जिथे आहेत त्या परिसरातील सार्वजनिक आरोग्याला मोठा धोका संभवतो असं दिसून येत आहे. विशेषतः ॲलर्जी, दमा, वृद्ध आणि लहान मुलांसाठी श्वसनाचे विकार हे आढळून येत आहेत. कबूतरांना आपण खाऊ न घातल्यास ते मरतील ही समजूत चुकीची आहे. पृथ्वीवरील लाखो प्रजाती माणसांशिवाय लाखो वर्षं टिकल्या आहेत हे लक्षात घ्यायला हवं. निसगार्ने त्यांना टिकण्याची क्षमता आणि स्वाभाविक संतुलन दिलं आहे. आता प्रश्न असा उपस्थित होतो की काय बरोबर? भावना की विज्ञान? तर मी असं म्हणेन की, कबूतर हा धार्मिक पक्षी नाही आणि तो धार्मिक मुद्दाही होऊ शकत नाही. हा सार्वजनिक आरोग्याचा आणि पर्यावरणाचा प्रश्न आहे, आणि तो त्याच तत्त्वांनुसार हाताळला पाहिजे. आपल्या लोकशाही भारताचं राज्य सेक्युलर आहे. म्हणून जेव्हा विज्ञान की धर्म हा प्रश्न येईल तेव्हा विज्ञानाची निवड करणं हेच सार्वजनिक हिताचं ठरणार आहे. जेव्हा भावना की आरोग्य हा प्रश्न येईल, तेव्हा विज्ञानच आरोग्याचं रक्षण करेल हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. राज्य सरकारने सुद्धा भावनाताईला गप्प करून, आरोग्यदादाचं ऐकलं पाहिजे. आणि आपण म्हणजे लोकांनीही वास्तव स्वीकारायला शिकलं पाहिजे. दाणे न दिल्यास कबूतरे मरतील असा विचार करणार्यांनी मग अँटीबायोटिक्स, अँटीव्हायरल, अँटीफंगल्स वापरू नयेत, कारण त्यात हजारो जीवाणू, विषाणू, बुरशी मारतात. मग ही औषधं जीवहत्या, जीवसंहार करणारी ठरवावी लागतील ना? कबूतरांना खाऊ न घातल्याने त्यांची नैसर्गिक आहार शोधण्याची स्वाभाविक प्रवृत्ती वाढते, त्यांची संख्या नियंत्रणात राहते आणि निसर्गसाखळी सुरक्षित राहते. माझी विनंती आहे, की श्रद्धा आणि भावना जपून, दाणे टाकणे फक्त परवानगी असलेल्या ठिकाणी आणि मर्यादित प्रमाणातच करूया. रुग्णालय, सार्वजनिक ठिकाणी, गल्ल्यांमध्ये कबूतरांना दाणे टाकणे टाळा. चिमण्यांना परत आणायचं असेल, तर कबूतरांचा अतिरेक थांबवावाच लागेल. हाच खरा धर्म-जिथे श्रद्धा, विज्ञान आणि सहअस्तित्व एकत्र येतात! ङ्घ डॉ. कोठारी यांनी ज्या कळकळीने हे म्हटलं आहे ती कळकळ सर्वधर्मीय नागरिक, राज्य सरकार आणि संबंधित यंत्रणांनी समजून घेतली तर कबूतरखान्याचं काय करायचं हा प्रश्न जटिल वाटणार नाही. खरं तर डॉक्टरांनी या निवेदनाद्वारे तर्क, विवेक आणि विज्ञान यांचा जसा पुरस्कार केला आहे, त्याचप्रमाणे जैन धमार्ची जी अहम तत्त्व आहेत तीच प्रभावीपणे सांगितली आहेत हे बारकाईनं वाचलं तर लक्षात येईल. म्हणजे, मी सर्व जीवांना क्षमा करतो, विश्वातील सर्व जीवमात्रांना-सर्व जीव, या विश्वातील सर्व सजीव माझे मैत्र आहेत. माझे कोणाशीच वैर नाही. अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांतवाद ही तीन जैन तत्त्वं आहेत. अहिंसा म्हणजे कोणत्याही जीवाला शारीरिक अथवा मानसिक हिंसेच्याद्वारे नष्ट करणार नाही. अपरिग्रह म्हणजे कोणत्याही गोष्टीचा गरजेपेक्षा अधिक संग्रह करणार नाही आणि अनेकांतवाद म्हणजे सत्य केवळ एकाच बाजूने नाही, तर सर्व बाजूंनी तपासून मगच धारणा बनवेन. कबूतरांना खाऊ घालण्याच्या अतिरेकी आग्रहामुळे अन्य जीवांवर संकट ओढणार असेल तर त्यात अहिंसेचं तत्त्व मागं पडतं. पुष्कळ ठिकाणी कबूतरखान्यांमध्ये धान्याच्या गोणीच्या गोणी ओतल्या जातात. कोणतेही परिश्रम न करता कबूतरांना गरजेपेक्षा अधिक मिळालेलं अन्न खाऊन त्यांच्या नैसर्गिक क्षमतांना बाधा येते, म्हणजेच अपरिग्रहाचं तत्त्व मागं पडलं. आणि समाजव्यवहार, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरणीय संतुलन या कोणत्याच अंगाचा विचार न करता न्यायालयाचा निर्णय धाब्यावर बसवून धार्मिक भावनांच्या नावाखाली कबूतरखाना हटवण्यास विरोध करणे... तोही उग्र पद्धतीनं हे अनेकांतवादाला विसरण्यासारखं झालं.

# सैन्याला जाणून घ्यायला हवे!

26 जानेवारी, 15 ऑगस्ट, या दिवशी होणारी दिल्लीतील परेड, मानवंदना, चित्तथरारक कवायती, जाहीर होणारे मानसन्मान, रणगाडे, तोफा, लढाऊ विमाने, अग्निबाण यांचे घरी बसून झालेले सहज दर्शन, क्या बात है, जय जवान, जय किसान, मेरे देश की धरती, ये देश है वीर जवानों का हा ज्वर सुट्टी संपली की दुर्सया दिवशी ओसरतो आणि आपण त्यांना विसरतो. सैन्य दलाविषयी, त्याच्या रचनेबाबत, सैनिकांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आयुष्याविषयी माहिती मिळावी यासाठी मुक्काम : आर्मी पोस्ट ऑफिस हे पुस्तक वैदेही देशपांडे यांनी लिहिले आहे. नो युवर कस्टमर म्हणजे केवायसी. हे प्रकरण गेल्या दशकात उदयाला आले. बँक, विमा कंपन्या, गॅस वितरक यांच्या अगणित ग्राहकांची माहिती पुन्हा नव्याने मागवून, त्यांच्या संग्रही असलेल्या कधी काळच्या मूळ अजार्शी सुसंगत आहे की नाही, वय सोडून त्यात इतर काय बदल झाले आहेत, जुने, ओळखू न येणारे फोटो नव्याने घेऊन, नाव, पत्त्यातील काही बदल याची अद्ययावत माहिती संग्रहित केली जाते. दर काही वर्षांनी त्याची फेरतपासणी केली जावी अशा सूचना नियामक मंडळाने केलेल्या आहेत.




काही सभासद निधन पावले, देश सोडून निघून गेले तरी त्या सेवा घरातील वारसदार घेत असतात. यातून काही फसवणुकीचे प्रकार घडतात, याला आळा बसावा म्हणून ही मोहीम ठराविक कालावधीने राबवली जाते. कित्येक बँक खाती किरकोळ रकमेसह पटावर असतात, मात्र त्यात वषार्नुवर्ष काहीच व्यवहार होत नसतील, तर प्राधान्याने त्याची फेरतपासणी होणे अनिवार्य असते. पूर्वी प्रत्येक खातेदाराला बँक कर्मचारी नावाने ओळखत असत, कारण तेव्हा खातेदारांची संख्या मर्यादित होती आणि वारंवार कामाच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटीगाठी होत असतं. आता तशी गरज नसल्याने, बँकेत फारसे जावे लागत नाही. यामुळे अशी पडताळणी होणे अनिवार्य झाले आहे. गैरप्रकार, फसवणूक टाळण्यासाठी ती माहिती मागणे, आणि देणे हिताचे आहे. तो नवीन व्यवस्थेचा एक अनिवार्य भाग आहे. अगदी नोकरीच्या ठिकाणीसुद्धा अशी माहिती ठराविक कालावधीत मिळविली जाते. आर्थिक व्यवहार असलेल्या ठिकाणी दरवर्षी द्यावा लागणारा हयातीचा दाखला हेसुद्धा आवश्यक झाले आहे. एकसारख्या नावांचा वापर करून होणारी फसवणूक टाळण्यासाठी हे आवश्यक असते. नो युवर कस्टमर, म्हणजे तुमच्या ग्राहकांची अद्ययावत माहिती संग्रहित करा ही मोहीम आता आपल्या परिचयाची झाली आहे.

याच धर्तीवर एक मोहीम संपूर्ण देशात राबवली जावी असे मला नेहमी वाटते, त्याचे नाव केवायए द्या. म्हणजे नो युवर आर्मी. म्हणजे आपल्या संरक्षण दलाविषयी माहिती करून घ्या. जगभरातील अनेक देशात सक्षम तरुण-तरुणींनी किमान 2/4 वर्षे सैन्य दलात सेवा पुरविणे अनिवार्य आहे. प्रत्येकाने शस्त्र चालविण्यात पारंगत व्हावे हा त्यामागील उद्देश नाही, मात्र राष्ट्र प्रथम याची जाणीव रुजावी. शिस्त, नियम, आदेश पाळणे याची सवय व्हावी यासाठी हा नियम अस्तित्वात आला आहे. मी श्रीमंत बड्या घरचा आहे, घरात असे पाच-सात नोकर माज्या दिमतीला आहेत, अशी कारणे चालत नाहीत. प्रत्येकाने इच्छा असो, अगर नसो, काही काळ तिथे घालवणे अनिवार्य असते. आपल्याकडे ती प्रथा नाही. शालेय शिक्षणात काही प्राथमिक सैनिकी प्रशिक्षण एनसीसीच्या माध्यमातून होते, पण ते ऐच्छिक. त्यातील फार थोडे, भविष्यात प्रत्यक्ष सैन्य दलात भरती होतात. 26 जानेवारी, 15 ऑगस्ट, या दिवशी होणारी दिल्लीतील परेड, मानवंदना, चित्तथरारक कवायती, जाहीर होणारे मानसन्मान, रणगाडे, तोफा, लढाऊ विमाने, अग्निबाण यांचे घरी बसून झालेले सहज दर्शन, क्या बात है, जय जवान, जय किसान, मेरे देश की धरती, ये देश है वीर जवानों का हा ज्वर सुट्टी संपली की दुर्सया दिवशी ओसरतो आणि आपण त्यांना विसरतो. सैन्य दलाविषयी, त्याच्या रचनेबाबत माहिती प्रत्येकाला असायला हवी. देशासाठी कशा कशाची पर्वा न करता प्राणांची आहुती देर्णाया ज्ञात, अज्ञात सैनिकांचे अस्तित्व आपण गृहीत धरले आहे. अशा सैनिकांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आयुष्याविषयी काही पुस्तक रुपात उपलब्ध आहे त्याविषयी. मुक्काम : आर्मी पोस्ट ऑफिस हे वैदेही देशपांडे यांचे दीडशे पानी पुस्तक एकदा सवडीने जरूर वाचायला हवे. एपीओ म्हणजे आर्मी पोस्ट ऑफिस. देशभरातून वेगवेगळ्या प्रदेशात सेवा बजावत असलेल्या सैनिकांचे पत्रव्यवहार होतात ते या माध्यमातून. मोबाईल, फोन हे अलीकडचे, पण त्यावर काही बंधने असतात. दुर्गम, डोंगराळ प्रदेशात अजूनही त्यात अडथळे येतात. अधिकार्याचे पूर्ण नाव, हुद्दा, 14 मराठा लाईट इन्फंट्री, सी/ओ. 56 झ्र एपीओ. इतकाच पत्ता. गावाचे अगर राज्याचे नाव नाही. अशी हजारो पत्रे आजही गहाळ न होता, तत्परतेने त्या सैनिकाला हातात मिळतात. अधिकार्यांना प्रशिक्षण पूर्ण केल्यावर प्रत्यक्ष सेवेत जाताना स्वतःचे रेजिमेंट निवडण्याचे स्वातंत्र्य असते. अर्थातच तिथे त्या जागा रिक्त असतील तर. सेकंड लेफ्टनंट, लेफ्टनंट, कॅप्टन, मेजर, ले. कर्नल असे हुद्दे तो पलटनित (रेजिमेंट) चढतो, या प्रवासाला 18 ते 20 वर्षे लागतात. कुठल्याही सैनिकाचे, अधिकार्याचे नाव रेजिमेंटशी जोडलेले असते, आणि ते शेवटपर्यंत कायम असते, अगदी निवृत्त झाल्यानंतरसुद्धा आपली ओळख करून देताना रेजिमेंटचा उल्लेख अनिवार्य. फील्ड मार्शल माणेकशा यांची पलटण 8 गुरखा. हा उल्लेख आजही त्याच्या नावाशी जोडला गेलाय. 1 युनिट म्हणजे एक पलटण. क्रमांक 1,2,3ङ्क आणि पुढे मराठा, पंजाब अशी नावे. मराठा रेजिमेंटच्या 1 मराठा, दोन मराठा या 250 वर्षे जुन्या पलटणी आहेत आणि त्यांना शौयार्चा वैभवशाली इतिहास आहे. या नावांचा उल्लेख सैन्य दलात अतिशय आदरपूर्वक होतो. मराठा पलटणींची संख्या ही तुलनेने खूप मोठी आहे, ही बाब आपल्यासाठी अभिमानाची.

सर्वसाधारण नागरी जीवनात असणारे गुणदोष याही जीवनात आहेत. मोठ्या यंत्रणेतील अनेक त्रुटी आहेत, या यंत्रणेचा भाग बनलेली अनेक माणसे भारताच्या कानाकोर्पयातून आपल्या गुणदोषांसकट आली आहेत, परंतु ती या भारतवषार्तील मातीचे रंग रूप घेऊन त्यात मिसळली आहेत, आणि देशाचे संरक्षण या एकाच ध्येयाने प्रेरित आहेत.

एका रेजिमेंटचे जवान एका भागातील अथवा एका जातीचे असणे ब्रिटिशांना सोयीचे असल्याने त्यांनी तशी रचना जाणीवपूर्वक केली, त्यात तथ्य असल्याने, आजही तीच पद्धत रूढ आहे. शिवाजी महाराज की जय, म्हटले की मराठा जवानाला जेव्हढी स्फूर्ती मिळेल, तेव्हढी शीख जवानाला मिळणार नाही, तर सत श्री अकालचा नारा दिल्यास त्यांना स्फुरण चढते, जे इतरांना तुलनेने कमी. वरकरणी छोट्या वाटर्णाया या गोष्टी युद्धनीतीत परिणामकारक ठरतात. अशा वीर पत्नींनी, मातांनी त्यांचे अनुभव पुस्तक रुपात लिहून ठेवले आहेत, ते जितके रोचक तितकेच स्फूतीर्दायक. ते वेळ काढून जरूर वाचायला हवेत. आपल्या मुलांना, नातवंडांना वाचून दाखवायला हवेत. प्रत्येकजण तिथे जाऊ शकणार नाही, पण नेमके तिथे काय घडते हे कर्तव्य म्हणून समजावून घ्यायला हवे. गप्पांच्या फडात कधीतरी यावर चर्चा व्हायला हवी. शालेय विद्यार्थ्यांना ही पुस्तकं सहज उपलब्ध असायला हवीत. येत्या स्वातंत्र्य दिनाला असे एखादे पुस्तक जरूर मिळवू. नो युवर ऑर्मी, क्या?

# हत्ती पाळीव की वन्य?

हत्तीच्या स्वभावाचा विचार केला तर हत्ती हा अत्यंत बुद्धिमान, भावनाशील आणि सामाजिक प्राणी आहे. त्याची स्मरणशक्ती चांगली आणि कळपात राहण्याची प्रवृत्ती असते. हत्ती निराशा, राग, हर्ष अशा भावना प्रकट करतात. कैदेत असलेल्या हत्तीमध्ये अनेक वेळा मानसिक विकार आणि आक्रमक वागणूकदेखील दिसून येते. हत्ती हे पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. माधुरी हत्तीच्या निमित्ताने पाळीव आणि वन्य हत्ती दोघांचा विचार करायला हवा. हत्तीचे पारंपरिक धार्मिक महत्त्व आणि वन्यजीव कायदा याचीदेखील माहिती घ्यायला हवी. नाण्याच्या दोन्ही बाजू मांडणारा हा लेख असून आता हत्ती पाळीव असावा की वन्य हे वाचकांनीच ठरवायचे आहे.

सध्या माधुरी नावाच्या हत्तीच्या पाळण्यावरून सुरू असलेली चर्चा ही फक्त एका प्राण्याची कथा नाही, तर ती भारतातील वन्यजीव संरक्षणाच्या कायद्यातील गुंतागुंती, सांस्कृतिक श्रद्धा आणि वन्यप्राण्यांच्या हक्कांचा संघर्ष अधोरेखित करते. हत्तीचा सांस्कृतिक व ऐतिहासिक इतिहास बघितला तर भारतात हत्तीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राचीन काळापासून आहे. भारतीय हत्ती, ज्याला वैज्ञानिकदृष्ट्या एलिफास मॅक्सिमस इंडिकस म्हणून ओळखले जाते. भारतीय इतिहासात हत्तींनी युद्धात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, त्यांनी सैन्याच्या ताकदीला बळकटी देणारी असंख्य कार्ये केली आहेत. युद्धातील हत्तींचे चित्रण चित्रे, शिल्पे, धर्मग्रंथ, लोककथा आणि अगदी चित्रपटांमध्येही आढळते.



रथ, घोडदळ आणि पायदळ यांच्यासोबत सैन्य निर्मितीत त्यांचे प्रमुख स्थान होते. मगध राजवंशापासून ते पालपर्यंत, सर्वजण हजारो हत्ती असलेल्या त्यांच्या शक्तिशाली सैन्यासाठी ओळखले जात होते. गणपती, ऐरावत (इंद्राचा हत्ती) हे हत्तीचे रूप हिंदू धर्मात पूजनीय मानले जाते. गजेंद्र मोक्षही कथा पुराण (प्राचीन धार्मिक ग्रंथ) मध्ये देखील वाचायला मिळते. ऐतिहासिक काळात राजे-महाराजे हत्तींचा वापर युद्धात, शोभायात्रेत व सन्मानासाठी करत असत. अनेक मंदिरांमध्ये आजही हत्ती पूजेसाठी वापरले जातात, परंतु हे सर्व असलं, तरी आधुनिक कायदा आणि जनजागृती या भावनिक श्रद्धांपेक्षा वेगळी आहेत.

हत्तीच्या स्वभावाचा विचार केला तर हत्ती हा अत्यंत बुद्धिमान, भावनाशील आणि सामाजिक प्राणी आहे. त्याची स्मरणशक्ती चांगली, आणि कळपात राहण्याची प्रवृत्ती असते. हत्ती निराशा, राग, हर्ष अशा भावना प्रकट करतात. कैदेत असलेल्या हत्तीमध्ये अनेक वेळा मानसिक विकार आणि आक्रमक वागणूकदेखील दिसून आली आहे. हत्ती हे पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते जंगलांमध्ये बिया पसरवण्यात मदत करतात आणि वनस्पतींच्या वाढीस प्रोत्साहन देतात. हत्ती (कुटुंबातील एलिफंटिडे), सर्वात मोठा जिवंत जमिनीवरील प्राणी आहे. हत्तींचे मूळ आशिया आणि आफ्रिका या दोन खंडांमध्ये आहे. या विशाल प्राण्यांचे प्रागैतिहासिक पूर्वज सुमारे 40 दशलक्ष वर्षांपूर्वी आफ्रिकेत दिसले. दोन्ही खंडांवर, मानव-हत्ती संघषार्मुळे पूर्वीच्या हत्तींचे वर्चस्व असलेल्या जमिनींवर वाढत्या घुसखोरीमुळे त्यांचे अधिवास कमी होत आहेत. माणसाने या प्राण्याला पाळीव करून अतिशय उपयुक्त बनवले आहे. प्राचीन काळी सैन्यात हत्तींचा वापर केला जात असे. युद्धात हा प्राणी शस्त्रापेक्षा कमी नव्हता. राजा, महाराजा आपल्या सैन्याच्या ताफ्यात घोड्यांसह हत्ती ठेवत असत..अनेक संस्कृतींमध्ये हत्तींना पवित्र मानले जाते. ते शक्ती, बुद्धी आणि समृद्धीचे प्रतीक आहेत.

हत्ती सुमारे 26 दशलक्ष वर्षांपूर्वी अस्तित्वात होते, असे मानले जाते. त्या काळात, अनेक प्रजाती होत्या, पण आता फक्त दोनच प्रजाती शिल्लक आहेत. जागतिक स्तरावर हत्तींचे संरक्षण आणि संवर्धनासाठी जनजागृती करण्यासाठी 12 ऑगस्ट हा दिवस ह्यजागतिक हत्ती दिनह्ल म्हणून साजरा केला जातो. हत्ती कायदेशीर पाळता येतो का? याविषयी भारतीय कायदा सांगतो की, वन्यजीव संरक्षण कायदा, 1972 नुसार हत्ती हा अनुसूची-1 मधील वन्य प्राणी आहे. याचा अर्थ हत्तीला सर्वोच्च संरक्षण देण्यात आले आहे. त्याला मारणे, पकडणे, व्यापार करणे, विकणे किंवा स्थानांतर करणे हे कायद्यानुसार गुन्हा आहे. पाळीव हत्ती हा फक्त परवानगी असल्यास आणि वन विभागाच्या नोंदणीत असल्यासच ठेवता येतो.

हत्तीचे मालकी हक्क प्रमाणपत्र वन विभागाकडून मिळते, पण नवीन प्रमाणपत्रे देणे आता अतिशय अवघड झाले आहे. हत्तीचे हस्तांतर किंवा इतर राज्यात नेणे यासाठी वन विभागाची विशेष परवानगी आवश्यक असते. पाळीव आणि जंगली हत्ती यामधील फरक जर बघितला तर पाळीव हत्तीचा वावरण्याचा स्वभाव माणसांशी सवयीचा, पण मर्यादित स्वातंत्र्य तर जंगली हत्ती स्वतंत्र, नैसर्गिक जीवनशैली जगणारा असून पाळीव हत्तीचे आरोग्य वेळच्यावेळी तपासणी करतात तर जंगली हत्तीचे आरोग्य हे मुक्त जीवन असते. पाळीव हत्तीचे मानसिक आरोग्य अनेकदा उदासीनता, आक्रमकपणा तर जंगली हत्ती निसगार्शी जोडलेले, पण काहीवेळा मानव-संघर्ष देखील बघावयास मिळतो.

हत्तीविषयी माहिती मुलांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यासाठी शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम, प्राण्यांच्या नैसर्गिक हक्कांची माहिती देणं, हत्तींचे वास्तव चित्रण करणारे चित्रपट डॉक्युमेंटरी व माहितीपट दाखविणे, नागरिकांना वन्यजीव कायद्याविषयी माहिती देणे. असे उपक्रम राबविल्यास भविष्यात असा संघर्ष होणार नाही. हत्ती पाळण्याचे फायदेदेखील आहेत. पूर्वीच्या काळात जड सामान वाहून नेण्यासाठी हत्ती वापरले जात, झाडे उपटणे/ रस्ते तयार करणे, जंगलात लॉगिंग (लाकूड वाहतूक) कामासाठी, धार्मिक आणि सांस्कृतिक कामासाठी उपयोग, मंदिरातील शोभायात्रा असेदेखील उपयोग केले जातात. वन विभागदेखील विविध अभयारण्यात पाळीव हत्तीचा उपयोग करून जंगल सुरक्षित ठेवण्याचे काम करीत आहे. दक्षिण भारतात उत्सवात हत्तींना सजवून मिरवले जाते. गणपतीच्या रूपात श्रद्धा-हत्तीचा आकार गणपतीशी जोडला जातो. पर्यटनस्थळांवर आकर्षण असते. यामुळे हत्ती सफारी/ छायाचित्रण पर्यटनातून उत्पन्न मिळते. हत्तीच्या वर्तनाचा अभ्यास व संशोधनासाठी पाळीव हत्ती वापरले जातात. प्राणीचिकित्सा प्रशिक्षणाद्वारे हत्तींच्या शारीरिक समस्यांवर उपचार करण्यासाठी अभ्यास करता येतो.

धार्मिक, सांस्कृतिक महत्त्व, माधुरी हत्ती मठाशी संबंधित असल्याने, अनेक जण याला श्रद्धेचा भाग मानतात, वषार्नुवर्षे संगोपन, हत्तीचा मालकी हक्क, जर वैध मालकी हक्क असेल आणि वन विभागाची परवानगी असेल, तर कायद्याने पाळण्याची संधी मिळू शकते. यामुळे हत्ती पाळता येऊ शकतो तर कायद्याच्या दृष्टीने भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा, 1972 नुसार हत्ती हा अनुसूची-१ अंतर्गत संरक्षित प्राणी असल्याने तो पाळता येत नाही.

नवीन हत्ती पाळण्यासाठी नियमित परवानगी मिळणे अत्यंत कठीण आहे. जर परवानगीशिवाय हत्ती ठेवला असेल, तर तो कायद्याने गुन्हा ठरतो. हत्ती रागावला तर तो प्रचंड नुकसान करू शकतो, काही घटनांमध्ये हत्तीने आपल्याच महावतांना मारल्याचेही निदर्शनास आले आहे. श्रद्धा बाजूला ठेवली, तरी हत्तीला देव मानून त्याला कैदेत ठेवणं हा विरोधाभास आहे, असे वन्य अभ्यासकांचे म्हणणे आहे. तर दुसरीकडे भारतात हत्तीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व बघता कायदेशीर पूर्तता करून पाळीव हत्तीचे संवर्धन कसे करता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे हत्तीप्रेमींना वाटते.

# आरोग्य

## पावसाळ्यात कारले खाण्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या



पावसाळ्यात कारल्याचे अनेक फायदे आहेत, जे तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यास मदत करतात. ते शरीराला संसर्गापासून वाचवण्यास देखील मदत करते.

पावसाळ्यात तापमान आणि आर्द्रता दोन्ही वाढते, ज्यामुळे शरीरात अनेक प्रकारचे संसर्ग आणि पचन समस्यांचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत कारला म्हणजेच कारला एक सुपरफूड म्हणून काम करतो.त्याचे फायदे जाणून घ्या.

### पचनसंस्था मजबूत करते

पावसाळ्यात गॅस, अपचन आणि पोटदुखीच्या तक्रारी अनेकदा वाढतात. कारल्यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स पोट स्वच्छ करण्यास मदत करतात.

### रोगप्रतिकारशक्ती वाढवते

पावसाळ्यात विषाणूजन्य संसर्ग, सर्दी आणि खोकला हे सामान्य होतात. कारल्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि हंगामी आजारांपासून संरक्षण करतात.



### रक्तातील साखर नियंत्रित करते

कारल्यामध्ये आढळणारे पॉलीपेप्टाइड-पी आणि चॅरंटीन सारखे घटक रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. पावसाळ्यात जेव्हा हालचाली कमी होतात तेव्हा मधुमेहाच्या रुग्णांसाठी कारल्याचा वापर खूप उपयुक्त ठरू शकतो.

### त्वचा आणि केस निरोगी बनवते

पावसाळ्यात त्वचेवर पिंपल्स आणि केसांमध्ये कोंडा येणे ही सामान्य समस्या आहे. कारल्याचे सेवन शरीराला आतून स्वच्छ करते, ज्यामुळे त्वचेला नैसर्गिक चमक मिळते. त्यामुळे टाळूही निरोगी राहते.

### यकृताला डिटॉक्सिफाय करते

पावसाळ्यात तळलेले अन्न आणि बाहेरचे अन्न खाण्याची सवय यकृतावर परिणाम करते. कारल्यामुळे यकृत विषमुक्त होते आणि त्याचे कार्य सुधारते. शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास देखील ते उपयुक्त आहे.

### मलेरिया आणि डेंग्यू रोखण्यासाठी उपयुक्त

पावसाळ्यात मलेरिया आणि डेंग्यू सारख्या डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढतो. कारला नैसर्गिकरित्या रक्त स्वच्छ करते आणि शरीराला आतून बळकटी देते, ज्यामुळे संसर्गाशी लढण्याची शक्ती मिळते.

### सेवन कसे करावे?

तुम्ही कारल्याची भाजी बनवून खाऊ शकता. सकाळी रिकाम्या पोटी कारल्याचा रस (थोडा लिंबू घालून) प्या.

## पीसीओडीच्या त्रासापासून दूर राहण्यासाठी महिलांनी हे योगासन करावे

PCOS किंवा PCOD आजच्या महिलांमध्ये वेगाने वाढणारी हार्मोनल समस्या आहे, ज्यामुळे अनियमित मासिक पाळी, वजन वाढणे, पुरळ, थकवा आणि गर्भधारणेमध्ये समस्या यासारखी लक्षणे दिसून येतात. दोन्ही स्थितीत, शरीरातील हार्मोन्सची पातळी असामान्य होते. ज्यामुळे मासिक पाळी अनियमित होऊ शकते आणि ओव्हुलेशनमध्ये समस्या येते.लठ्ठपणा, खराब आहार आणि शारीरिक हालचालींचा अभाव देखील या परिस्थिती वाढवू शकतो. नियमित औषधांसह योग ही समस्या मुळापासून बरी करण्यास मदत करू शकतो. तसेच या त्रासापासून दूर राहण्यासाठी काही योगासन करू शकता. चला तर मग जाणून घेऊ या कोणती आहे ही योगासन.

### बद्ध कोनासन

हे आसन पेल्विक प्रवाह उघडण्यास आणि रक्ताभिसरण वाढविण्यास मदत करते. बद्ध कोनासनाला फुलपाखरू आसन असेही म्हणतात. या आसनामुळे कंबर, मांड्या आणि गुडघे उघडण्यास मदत होते, ज्यामुळे लवचिकता वाढते. हे पचन सुधारण्यास, मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यास, तणाव आणि चिंता कमी करण्यास तसेच प्रजनन प्रणाली निरोगी ठेवण्यास देखील मदत करते. हे आसन पेल्विक क्षेत्रात रक्त परिसंचरण वाढवते आणि अंडाशय सक्रिय करते.

#### कसे कराल

या आसनाचा सराव करण्यासाठी सर्वप्रथम जमिनीवर बसा दोन्ही पाय जोडून घ्या आणि गुडघे वर खाली करा.

### सेतुबंधासन:

हे ताण कमी करण्यास आणि थायरॉईड ग्रंथी, मासिक पाळी नियमित करण्यास मदत करते. सेतुबंधासनाला ब्रिज पोज म्हणतात ज्यामध्ये शरीराची मुद्रा एका पुलसारखी बनते. हे आसन पाठदुखी कमी करण्यास, स्नायूंना बळकटी देण्यास आणि ताण कमी करण्यास मदत करते. याशिवाय, ते रक्ताभिसरण सुधारते जे गर्भधारणा आणि प्रसूतीसाठी फायदेशीर आहे. ते हार्मोनल संतुलन देखील सुधारते आणि गर्भाशयाच्या स्नायूंना बळकटी देते.

#### कसे कराल

या आसनाचा सराव करण्यासाठी सर्वप्रथम पाठीवर झोपा, गुडघे वाकवा आणि कंबर वर करा.



### धनुरासन

हे हार्मोनल संतुलन आणि अंडाशय सक्रिय करण्यास मदत करते. धनुरासन मूत्रपिंडांना मालिश करण्यासाठी, त्यांचे कार्य उत्तेजित करण्यासाठी आणि विषाक्त पदार्थांपासून मुक्त होण्यासाठी परिपूर्ण आहे. तसेच, ते पाठीचा कणा मजबूत करते आणि पाठदुखीपासून आराम देते.

#### कसे कराल

या आसनाचा सराव करण्यासाठी सर्वप्रथम पोटावर झोपा आणि तुमचे गुडघे वाकवा. तुमचे घोटे मागून धरा. श्वास घ्या आणि छाती आणि मांड्या जमिनीपासून वर करा. खोल श्वास घेत १५-२० सेकंद धरून ठेवा.

### नाडी शोधन प्राणायाम

नाडी शोधन प्राणायाम हार्मोन्स संतुलित करण्यासाठी, मानसिक ताण कमी करण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यासाठी प्रभावी आहे. हा प्राणायाम नसा शुद्ध करण्यासाठी केला जातो आणि त्याची तंत्रे अनुलोम-विलोम सारखीच आहेत, परंतु ती अधिक ध्यान आणि शांत करणारी आहेत.

## पपईचा रस पिण्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या

पपई हे एक असे फळ आहे जे केवळ चवीलाच चविष्ट नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. त्यात जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरतात. दररोज एक वाटी पपई खाल्ल्याने तुमच्या आरोग्याला अनेक फायदे मिळू शकतात.

अनेकांना पिकलेली पपई खायला आवडत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही पिकलेल्या पपईचा रस पिऊ शकता, त्याची चव खूप चविष्ट असते आणि आरोग्यासाठी आरोग्यदायी असते. पिकलेल्या पपईचा रस पिण्याचे फायदे आणि पपईचा रस कसा बनवायचा ते जाणून घ्या.

### पिकलेल्या पपईचा रस पिण्याचे फायदे

तज्ञांच्या मते, पपईचा रस पिल्याने बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लता कमी होते. पपईमध्ये पपेन नावाचे एंजाइम असते जे पचन सुधारण्यास मदत करते. म्हणून, १ ग्लास पपईचा रस पोटासाठी खूप फायदेशीर ठरू शकतो.

### त्वचा आणि डोळ्यांसाठी फायदेशीर

दररोज पपईचा रस पिल्याने त्वचा आणि व्हिटॅमिन-ए ते दृष्टी



डोळ्यांनाही फायदा होतो. त्यात आणि व्हिटॅमिन-सी असल्याने, सुधारण्यास आणि त्वचा चमकदार बनविण्यास मदत करते. पपईचा रस पिल्याने चेहऱ्यावर चमक येते आणि सुरकुत्या दूर होतात.



### रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते

पपईचा रस पिल्याने केवळ त्वचा आणि डोळ्यांनाच फायदा होत नाही . उलट, त्याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते. पपईमध्ये व्हिटॅमिन सी देखील आढळते. ते पिल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. याशिवाय, पपईमध्ये अँटीऑक्सिडंट्स देखील आढळतात जे शरीराला मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करतात.

### कसे बनवाल

पपईचा रस बनवण्यासाठी, प्रथम एक पिकलेली पपई घ्या. पपईची साल आणि बिया काढून त्याचे जाड तुकडे करा. आता पपई मिक्सरच्या ज्यूस जारमध्ये ठेवा. गरजेनुसार त्यात पाणी मिसळा. ते मिक्सरमध्ये चांगले बारीक करा. आता चवीनुसार काळे मीठ घाला. जर तुम्हाला गोड रस प्यायचा असेल तर तुम्ही थोडी साखर घालू शकता. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्या. तुम्हाला आश्चर्यकारक फायदे मिळतील.

## पौष्टिकतेने समृद्ध असलेला ड्रायफ्रूट 'पिस्ताचे' सेवन करा फायदे जाणून घ्या

लहान, हिरवा रंग असलेला 'पिस्ता' हा पौष्टिकतेचा खजिना आहे. प्रथिने, फायबर, निरोगी चरबी, कार्बोहायड्रेट्स, पोटॅशियम, फॉस्फरस, व्हिटॅमिन बी६, थायामिन, तांबे, मँगनीज यांनी समृद्ध असलेले हे नट आपल्या आरोग्यासाठी अनेक फायदे देते. त्याच्या सेवनाने अनेक आजार बरे होतात.चला जाणून घेऊ या पिस्ताचे फायदे.

### वजन कमी करते

पिस्ता प्रथिने समृद्ध असतात, त्यामुळे ते खाल्ल्याने पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे आपण कमी खातो. अशा प्रकारे, ते वजन कमी करण्यास मदत करते.

### हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर

पिस्तामध्ये असलेले पोटॅशियम आणि मॅग्नेशियम आपल्या रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतात. त्याचे नियमित सेवन केल्याने आपल्या शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते आणि चांगल्या कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. या कारणांमुळे आपले हृदय निरोगी राहते.

### रक्तातील साखर कमी करते

कमी ग्लायसेमिक इंडेक्समुळे, पिस्त्याचे सेवन आपल्या रक्तातील साखरेची पातळी वाढण्यापासून रोखते. त्याच वेळी, त्यात असलेले प्रथिने आणि निरोगी चरबी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी त्याचे सेवन खूप फायदेशीर ठरू शकते.

### त्वचेसाठी फायदेशीर

पिस्ता खाल्ल्याने आपली त्वचा घट्ट राहते. त्यामुळे आपली खराब झालेली त्वचा दुरुस्त होण्यासही मदत होते. पिस्त्याचे नियमित सेवन केल्याने चेहऱ्यावरील अकाली सुरकुत्या टाळता येतात.

### पचन चांगले करते

पिस्ता हा आहारातील फायबरचा चांगला स्रोत मानला जातो. त्यात असलेल्या फायबरमुळे त्याचे सेवन आपले पचन सुधारण्यास मदत करते. ते बद्धकोष्ठतेला देखील प्रतिबंधित करते. अशा प्रकारे आपली पचनसंस्था निरोगी राहते.



## पावसाळ्यात आजारांपासून वाचवेल तांब्याचे पाणी कसे काय जाणून घ्या



पावसाळ्यात सर्दी, खोकला, डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड आणि पोटाशी संबंधित आजारांचा धोकाही वाढतो. या ऋतूत आर्द्रता, घाण आणि दूषित पाण्यामुळे बॅक्टेरिया आणि विषाणू वेगाने पसरतात, ज्यामुळे मुले आणि वृद्धांची प्रतिकारशक्ती कमकुवत होते. अशा परिस्थितीत, तांब्याच्या भांड्यातून पाणी प्यायल्याने आरोग्यदायी फायदे मिळतात.कसे काय जाणून घेऊ या.

आयुर्वेदात तांब्याला औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण धातू मानले जाते. जेव्हा तुम्ही रात्रभर तांब्याच्या भांड्यात पाणी साठवून सकाळी रिकाम्या पोटी ते सेवन करता तेव्हा हे पाणी शरीराला अनेक फायदे देते. त्याला 'ताम्र जल' म्हणतात आणि ते शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत करते.

तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी अँटी-बॅक्टेरियल, अँटी-व्हायरल आणि अँटी-ऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असते, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. विशेषतः पावसाळ्यात जेव्हा रोग पसरण्याचा धोका जास्त असतो, तेव्हा हे पाणी तुमचे संरक्षण करण्यास मदत करू शकते.

### पचनसंस्था सुधारते:

पावसाळ्यात पोटदुखी आणि अन्नातून विषबाधा होणे या सामान्य समस्या आहेत. तांब्याचे पाणी पिल्याने पचनसंस्था मजबूत होते आणि गॅस, अपचन, आम्लपित्त यासारख्या समस्या कमी होतात.

### शरीराला डिटॉक्सिफाय करते:

तांब्याचे पाणी शरीरातील विषारी घटक काढून टाकण्याचे काम करते. ते यकृत आणि मूत्रपिंड स्वच्छ करते आणि शरीराला नैसर्गिकरित्या विषमुक्त करते.

### संसर्ग रोखते:

तांब्यामध्ये बॅक्टेरिया आणि बुरशी नष्ट करण्याची नैसर्गिक क्षमता असते. म्हणून, तांब्याच्या भांड्यात साठवलेले पाणी संसर्ग रोखण्यासाठी उपयुक्त ठरते.

### कसे वापरायचे?

रात्रभर तांब्याच्या भांड्यात किंवा बाटलीत पाणी ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी प्या. लक्षात ठेवा की भांडे नियमितपणे लिंबू किंवा चिंचेने स्वच्छ करावे जेणेकरून ते चमकदार आणि बॅक्टेरियामुक्त राहील.

# जुन्या, धोकादायक इमारतींचा प्रश्न कायम!

## 14 वर्षांपासून पुनर्विकास रखडल्याने रहिवासी न्यायालयात

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईची इतिहास, भौगोलिकदृष्ट्या वाढ होत असताना शहर भागातील जुन्या चाळी, इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर झाला आहे. दरवर्षी पावसाळा आला की, मुंबईतील जुन्या, धोकादायक चाळी, इमारतींतील रहिवाशांसमोरील चिंतेचे ढग गडद होतात. जस की वरळी येथील बीडीडी चाळ येथील रहिवासी 500 फुटांच्या घरात दिवाळी साजरी करण्याचे नियोजन करीत असताना गिरगाव येथील जगन्नाथ चाळ झाऊबा वाडी येथील रहिवाशांना मात्र रखडलेल्या पुनर्वसनाचा लढा लढवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. १४ वर्षांपासून पुनर्विकास रखडल्याने विकासक आणि म्हाडाच्या कारभाराविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. ९१ अ कायद्याअंतर्गत रहिवाशांनी २५ चाळी आणि जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची मागणी केली आहे.



येथे पाचशेहून अधिक कुटुंबे पुनर्वसनाची वाट पाहत आहेत. जगन्नाथ चाळीचे रहिवासी आणि याचिकाकर्ता श्रेयस आचरेकर यांनी याप्रकरणी सांगितले की, विकासकाने हा प्रकल्प हाती घेतला असून आजपर्यंत या जागेवर कोणतेही काम झालेले नाही. गेल्या तीन वर्षांत रहिवाशांनी अनेक वेळा तक्रार केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकांमध्ये म्हाडाला स्पष्टपणे सूचना देत विकासाविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले होते . रहिवाशांनी वकिलांच्या माध्यमातून म्हाडा आणि संबंधित अधिकाऱ्यांना १० पत्रे पाठविण्यात आली आहेत.मात्र त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप स्थानिक रहिवासी रेखा दांडेकर यांनी केला आहे.

अनेक ज्येष्ठ नागरिक पुनर्विकासाची प्रतीक्षेत जग सोडून गेले आहेत. चाळी आता रहिवाशांसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे सर्व प्रशासकीय मार्ग संपल्यान रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हीच याचिका दहा लाखांहून अधिक भाडेकरांचे प्रतिनिधित्व करणारे श्रेयस आचरेकर, दीपक वैद्य, अनिमेष कर्माकर, प्रमोद देवधर आणि रेखा दांडेकर यांनी दाखल केली आहे.

प्रमुख मागण्या

म्हाडाने कलम ९१ अ लागू करून प्रकल्प स्वतःहाती घ्यावा.

प्रमाण इन्फ्रास्ट्रक्चरला दिलेल्या सर्व एनओसी तात्काळ रद्द करावेत.

विकासकाला कोणतीही नवीन परवानगी देणे थांबवावे.


हा प्रकल्प म्हाडा किंवा अन्य विश्वासार्ह आणि पारदर्शक संस्थेकडे सोपवावा.

वेळेत कारवाई न करणीया म्हाडा अधिकार्यांवर कारवाई करावी.

तर दुसरीकडे मुंबईतील वांद्रे-सायन ते कुलाबा पट्ट्यातील शहर भागात उपकरप्राप्त इमारतींची संख्या १४ हजारांपेक्षाही जास्त आहे. मुख्य म्हणजे त्यातील कित्येक बांधकामांना १०० वर्षांचा इतिहास आहे. हा इतिहास मांडला जातानाच तिथल्या बांधकामांचा दर्जा हा चिंतेचा विषय आहे. त्यावर अद्याप तोडगा निघत नसल्याने येथील रहिवाशांना जीव मुठीत घेऊन राहावे लागते.

## पोलीस हेल्पलाईनवर तब्बल ९५,००० तक्रारी, तक्रारींमध्ये ६० टक्क्यांहून अधिक वाढ

प्रवासातील अडचणी सोडविण्यासह, मदतीसाठी प्रवासी मुंबई लोहमार्ग पोलिसांच्या १५१२ हेल्पलाइनवर फोन करतात. या हेल्पलाईनवर प्रवाशांकडून येणाऱ्या तक्रारींच्या संख्येत तब्बल ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. वर्ष २०२२ मध्ये रोज प्रवाशांच्या सरासरी ६० तक्रारी येत होत्या, मात्र वर्ष २०२४ मध्ये हीच संख्या १०९ वर पोहोचली आहे. यातील सर्वाधिक तक्रारी प्रवासा दरम्यान बॅग हरवल्याच्या आहेत. १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान रेल्वे पोलिसांच्या हेल्पलाइनवर एकूण ९५ हजारांहून अधिक फोन कॉल आले होते. त्यापैकी केवळ ४०२ कॉलवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्य तक्रारी ऐकून घेऊन त्यावर जागेवरच तोडगा काढून मिटवल्या आहेत. हेल्पलाइनवर येणारे ९९ टक्के कॉल तक्रारींचे आहेत. मात्र अवघ्या एक टक्क्याहून कमी कॉल गुन्हा दाखल करण्यास योग्य आहेत.



**सर्वप्रथम समुपदेशन**

मोबाइल चोरीपासून डब्यात अनधिकृतपणे पत्ते खेळण्यापर्यंतच्या तक्रारी हेल्पलाइनच्या माध्यमाने पोलिसांकडे नोंदवण्यात येतात. सर्व तक्रारींची नोंद घेतली जाते. प्रकरणाचे गांभीर्य पाहून गुन्हा दाखल केला जातो. हेल्पलाइनवर प्राप्त झालेल्या तक्रारींचे सर्वप्रथम समुपदेशनाने आणि त्यानंतर घटनास्थळी पोलिस पाठवून अडचणी सोडवल्या जातात. धकाधकीच्या जीवनात महिलांचा प्रवास कठीण होतो. खास करुन प्रवास करताना अधिक सावधानता बाळगण्याची गरज आहे. प्रवास करताना अनेक प्रसंगांसह वस्तू गहाळ होण्याचे प्रमाण असते. यासाठी हेल्पलाईन नंबर देण्यात आला.

**३२ प्रकारच्या तक्रारी**

बॅग हरवणे, बॅग सापडणे, प्रवाशांमधील भांडण, नशेखोरांचा वावर, गस्ती सुरक्षारक्षकांची अनुपस्थिती, मद्यपान करून प्रवास, दिव्यांग डब्यात घुसखोरी, फेरीवाले, भिकारी, जखमी, रेल्वे पोलिस / सरकारी कर्मचाऱ्यांची अयोग्य वर्तणूक, व्यक्ती हरवली, व्यक्ती सापडली, महिलेची छेडछाड, आजारी पडणे, स्टंट करणे, दगडफेक, चोरी, तृतीयपंथीयांचा त्रासदायक वावर, आरक्षित डब्यातून प्रवास, संशयास्पद व्यक्तीचा वावर, पाकीटचोरी, पत्ते खेळणे, भजन गाणे, सोनसाखळी ओढणे, मोबाइल चोरी, बॉम्बने उडवण्याची धमकी, माहिती न मिळणे, दरोडा आणि अन्य (वरील तक्रारी वगळता अन्य तक्रार) अशा ३२ प्रकारच्या तक्रारी हेल्पलाइनवर नोंदवण्यात येतात.

## आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाविरोधात कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संप

**■मुंबई । प्रतिनिधी,**

आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाच्या विरोधात आज बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी एकदिवसीय देशव्यापी संप केला. या संपात वरिष्ठ कार्यपालक वगळता कंत्राटी कर्मचारी, नियमित कर्मचारी आणि अधिकारी सर्वांनी सहभाग घेतला. मुंबईतील बँकेच्या मुख्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली.

सध्या आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. देशातील पहिली सार्वजनिक क्षेत्रातील बँक म्हणून ओळखली जाणारी आयडीबीआय



खाजसगी क्षेत्रात गेल्यास, सामान्य ठेवीदारांचे हित धोक्यात येईल, असे संपकरी कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यांनी सरकारला बँकेचा मालकी हक्क खासगी तसेच विदेशी भांडवलदारांकडे न देण्याचे आवाहन संपकरी कर्मचाऱ्यांनी सरकारला केले. युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआयचे देवीदास तुळजापूरकर म्हणाले की, आयडीबीआयचे खाजगीकरण हा आंतरराष्ट्रीय वित्तभांडवलाचा भारतीय बँकिंगवर हल्ला आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर इतरही भारतीय बँकांच्या बाबतीत तोच प्रयोग होईल. ज्यामुळे भारतीय बँकिंगचे अस्तित्व आणि सार्वभौमत्व धोक्यात येईल. सरकारने फेरविचार केला नाही तर सर्व संघटनांना सहभागी करून आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

## दहीहंडीच्या सरावादरम्यान अनर्थ; चिमुकल्या गोविंदाचा चटका लावणारा अंत; कुटुंबाचा आक्रोश

मुंबई :

गोविंदांच्या जीवाभावाचा दहीहंडीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. असे असतानाचा दुर्दैवी घटना समोर आली आहे. गोविंदा पथकांच्या सरावाला रंगत आली असतानाच पश्चिम उपनगरातून ही घटना समोर आल्याने सारेच हळहळले आहेत. कारण येथील ११ वर्षीय बालगोंविदाचा उंचावरुन पडून मृत्यू झाला आहे. दहिसर पूर्वच्या केतकीपाडा परिसरातील बालगोविंदांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली. नवतरुण गोविंदा पथकाचा बालगोविंदा महेश रमेश जाधव याचा सरावादरम्यान



मृत्यू झाला आहे. रविवारी रात्री अकराच्या सुमारास पथकाकडून मानवी थर रचले जात असतानाच महेश वरच्या थरावर चढण्यासाठी स्वार झाला.

पण चढत असतानाच त्याचा तोल आणि घात झाला. तो जमिनीवपर कोसळल्याने त्याला जबर मार बसला. यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्या बचावासाठी वेळ मिळाला नाही. यंदा 16 ऑगस्टला दहीहंडीचा उत्सव आहे. मुंबईतील दहीहंडी उत्सव तर जगभरात प्रसिद्ध आहे. हजारो गोविंद पथकं या उत्सवात सहभागी होतात. अत्यंत जिद्दीने आणि उत्साहाने गोविंदांसह सर्वच हा सण साजरा करतात. मानवी मनोऱ्यांचा थरार साऱ्यांना अनुभवायला मिळतो. दिवसभर विविध ठिकाणी मानाच्या हंड्या फोडून मोठमोठी बक्षीसे गोविंदा पथक पटकावतात. दहीहंडी फोडताना अनेक मंडळांकडून सात ते नऊ थर रचले जातात. हे थर रचताना अनेक गोविंदा जखमीही होतात. यामुळे सुरक्षितेतेची काळजी घेणे महत्वाचे असते. पण या घटनेमुळे गोविंदांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

## शिक्षण विभागाचं राज्यभरातील काम ठप्प, काय आहे नेमकं प्रकरण?

**■मुंबई । प्रतिनिधी,**

शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नसल्याने शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी काही दिवसांपासून बेमुदत सामूहिक रजा आंदोलन सुरु केले. त्यामुळे शिक्षण विभागाचे राज्यभरातील काम ठप्प झाले असून महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाने आंदोलनाबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्तांना दिले आहे. नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडी प्रकरण सध्या चर्चेत आहे. बोगस शालार्थ आयडी प्रकरणावरून अटक सत्र सुरू असल्याने अधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसत आहे. शालार्थ घोटाळा सायबर स्कॅम असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे : नागपूर विभागात काम करत असलेले शिक्षण अधिकारी, उपसंचालक यांच्याशी चर्चा केल्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांच्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार हे प्रकरण सायबर स्कॅम असल्याचे दिसत आहे, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. बोगस शिक्षकांना बोगस आयडी देऊन त्यांचे पगार दिल्याचे प्रकरण गंभीर आहे. शालार्थ प्रणालीत तांत्रिक छेडछाड किंवा लॉगिन आयडी, पासवर्ड वापरून गैरपद्धतीने पगार केले गेले आहेत, असे मत संघटनेने व्यक्त केले आहे. या प्रकरणातील खऱ्या गुन्हेगारांना शोधून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे. विनाचौकशी अटक केल्याचा संघटनेकडून निषेध : अजूनही मुख्य संशयित आरोपींना अटक झालेली नाही. नागपूर प्रकरणात सायबर गुन्हा दाखल झालेला असून बोगस शालार्थ घोटाळ्याबाबत शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या स्तरावरून दिलेले नसताना फक्त पगाराच्या एमटीआरवर प्रतिस्वाक्षरी केली म्हणून अधिकारयांना विनाचौकशी अटक केल्याचा संघटनेने निषेध केला आहे. याबाबत राज्यातील शिक्षण सेवेतील गट अ, गट ब संवगार्तील सर्व अधिकाऱ्यांनी १ ऑगस्ट रोजी सामूहिक रजा घेऊन आंदोलन करत संबंधितांना निवेदन दिले होते. पण, मागण्यांबाबत सकारात्मक विचार न झाल्याने आता बेमुदत आंदोलन करण्यात येत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

## प्रसिद्ध मराठी कलाकार किशोर कदम यांचे मुंबईतलं घर धोक्यात! मुख्यमंत्र्यांना केले मदतीचे आवाहन, नेमकं प्रकरण काय?

**■मुंबई । प्रतिनिधी,**

कवी सौमित्र म्हणून प्रसिद्ध असलेले मराठी अभिनेते किशोर कदम यांच्याविषयी एक मोठी बातमी समोर येत आहे. त्यांचे अंधेरी चकाला येथील घर धोक्यात आल्याची चर्चा आहे. यासंदर्भात किशोर कदम यांनी संबंधित बिल्डर आणि अधिकाऱ्यांची तक्रार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत, मदतीची मागणी केली आहे. किशोर कदम यांनी अंधेरी पूर्व येथील चाकाला परिसरातील हवा महाल सोसायटीच्या रिडेव्हलपमेंट प्रक्रियेत गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. सोसायटीच्या रिडेव्हलपमेंटच्या नावाखाली पीएमसी (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी) आणि बिल्डर यांनी संगनमताने सोसायटीच्या २३ सभासदांची घरे धोक्यात आणली असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह सर्वसामान्य जनतेला मदतीचे आवाहन केले आहे. त्यांनी सोशल मिडियावर या संदर्भात एक पोस्ट देखील शेअर केली आहे. ज्यात त्यांनी सविस्तर माहिती दिली आहे. बहुसंख्य सभासदांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन कमिटी, पीएमसी आणि बिल्डर यांनी संगनमताने हा घोटाळा घडवल्याचा आरोप सौमित्र यांनी या पत्राद्वारे केला आहे. सरकारच्या बहुसंख्येच्या कायद्यामुळे चौकस सभासदांचा आवाज दडपला जात असून, सामान्य माणसाला वषार्नुवर्षे बिल्डर आणि पीएमसीच्या आर्थिक ताकदीविरुद्ध लढावे लागत आहे.

## रक्षाबंधनालाच बहिणीची मुंडन करून हत्या, प्रियकराचाही मर्डर, राक्षसी भावाचं हादरवणारं कृत्य

**■मुंबई । प्रतिनिधी,**

ऑगस्टला देशभरात रक्षाबंधन साजरं केलं जात असतानाच भावा-बहिणीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना घडली आहे. 19 वर्षांच्या अरविंद कुमार याने आपल्या बहिणीचे मुंडन केलं आणि तिची गळा दाबून हत्या केली. बहिणीची हत्या केल्यानंतर अरविंदने तिचा मृतदेह दगड फोडण्याच्या खडकाळ टेकडीवर फेकून दिला. धक्कादायक बाब म्हणजे अरविंदने एक दिवस आधीच बहिणीचा 18 वर्षांचा प्रियकर विशाल अहिरवार याचीही हत्या केली आणि त्याचा मृतदेह 40 किमी लांब नदीच्या काठावर फेकून दिला.

दोन दिवसांच्या अंतराने मृतदेह सापडले

7 ऑगस्ट रोजी अरविंद आणि प्रकाश प्रजापती नावाचा त्याचा एक सहकारी टाहुआराली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पथराई गावात विशालच्या घरी पोहोचले तेव्हा हा प्रकार सुरू झाला. विशालच्या कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, त्या लोकांनी दिल्लीत नोकरी लावण्याच्या बहाण्याने विशालला त्यांच्यासोबत जाण्यास भाग पाडले.

अमेरिकेमुळे सोन्या चांदीवर मोठा दबाव! पुढच्या 7 दिवस कुठे असतील सोन्याचे भाव, एक्सपर्टने थेट सांगितलं

त्या संध्याकाळी, विशालने त्याच्या वडिलांना फोनवर सांगितले की तो ताहुआराली येथे आहे आणि कदाचित रात्री तिथेच थांबेल. यानंतर 8 ऑगस्ट रोजी, लाहचुरा पोलिसांनी नदीजवळील झुडुपातून एका अज्ञात तरुणाचा मृतदेह



आढळला. मृतदेहाच्या मानेवर जखमांच्या खुणा होत्या, ज्यामुळे गळा दाबून हत्या झाल्याचे संकेत मिळत होते. मृतदेहाचा फोटो नंतर सोशल मीडियावर आला आणि विशालच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचला, त्यामुळे 9 ऑगस्ट रोजी विशालची ओळख पटली.

यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी चंद्रपुरा गावातल्या स्थानिकांना जवळच्या टेकडीवर मुंडन केलेल्या तरुणीचा मृतदेह आढळला. हत्या झालेली तरुणी पुच्चू अहिरवार असल्याचं तपासात समोर आलं. पुच्चू अहिरवार ही अरविंदची धाकटी बहीण होती.

लव्ह स्टोरीचा भयावह अंत

पोलिसांच्या तपासात असे दिसून आले की विशाल आणि पुच्चू एका वर्षापेक्षा जास्त काळ प्रेमसंबंधात होते. दोघे पहिल्यांदा नुनार गावातील एका नातेवाईकाच्या घरी भेटले. त्यांच्या मैत्रीचं लवकरच प्रेमात रूपांतर झाली, पण दोघेही वेगळ्या जातीचे असल्यामुळे कुटुंबाकडून तीव्र विरोध सुरू झाला.

कुटुंबाचा विरोध झुगारून जानेवारीमध्ये जोडपे पळून गेले, त्यानंतर कुटुंबाने दोघंही बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. पोलिसांनीही तीन दिवसांत त्यांना शोधून काढले आणि परत आणले. पोलीस स्टेशनमध्ये तडजोड करण्यात आली आणि जोडपे वेगळे झाले. यानंतर पुच्चूपासून दूर जाण्यासाठी विशालचे कुटुंब हरियाणाला गेले.

पण दोघांनी फोनद्वारे संवाद साधणे सुरू ठेवले आणि पालकांच्या नकारानंतरही त्यांचे नाते टिकून राहिले. हत्येच्या दोन आठवड्यांपूर्वी, विशालचे कुटुंब रक्षाबंधनासाठी गावी परतले, यामुळे पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला.

अरविंद आणि प्रकाश यांनी विशालच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप विशालच्या वडिलांनी केला आहे. तर दुसरीकडे पुच्चूचे वडील पप्पू अहिरवार यांनी आपल्या मुलानेच या हत्या केल्याची कबुली दिली आहे. 'माझी मुलगी पुन्हा तिच्या प्रियकरासोबत पळून जाण्याचा विचार करत होती, त्यामुळे माझा मुलगा संतापला आणि त्याने तिचे मुंडन केले, तिचा गळा दाबला आणि तिचा मृतदेह टेकडीवर फेकून दिला', असं अरविंदच्या वडिलांनी पोलिसांना सांगितलं.

हत्येनंतर अरविंद फरार

झाशीचे एसएसपी बीबीजीटीएस मूर्ती यांनी पुष्टी केली की दोन्ही खून एकमेकांशी जोडलेले प्रकरण म्हणून तपासले जात आहेत. 'प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, मुलीच्या भावाने हा गुन्हा केला आहे. आम्ही तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे, ज्यामध्ये विशालला घेऊन जाणारा तरुण देखील आहे. भाऊ सध्या फरार आहे आणि त्याचा शोध घेण्यासाठी तीन पोलिस पथके तैनात करण्यात आली आहेत,₹ असे एसएसपी म्हणाले.

एसपी (ग्रामीण) डॉ. अरविंद कुमार यांनी पुढे सांगितले की 'फॉरेन्सिक पथकांनी दोन्ही गुन्ह्यांच्या ठिकाणाहून पुरावे गोळा केले आहेत. शवविच्छेदन तपासणीमुळे मृत्यूचे नेमके कारण समोर येण्यास मदत होईल. त्यांच्या नात्याला विरोध असल्याने आम्ही ऑनर किलिंगसह सर्व बाजूंनी तपास करत आहोत'.

दरम्यान पुरावे आणखी भक्कम करण्यासाठी पोलीस आसपासच्या परिसरातील कॉल रेकॉर्ड, मोबाईल लोकेशन आणि सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. तसंच या कटात आणखी लोक सामील होते का? याचाही तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००০१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com